## प्रकरण ६ वे
# उपसंहार

नीलम माणगावे यांच्या सामाजिक कादंब-याचा अभ्यास 'शोध' व 'मृत्युदंड' यांच्या अनुषंगाने करतांना आतापर्यंतच्या पाच प्रकरणात केलेल्या अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात मांडावयाचे आहेत.

नीलम माणगावे यांनी कथा, कादंबरी ,कविता, बालसाहित्य, लोकसाहित्य, आत्मकथन असे विविध प्रकार हाताळले आहेत. नीलम माणगावे यांच्या सामाजिक कादंब-या आशयदृष्टया वेगळ्या असल्याने त्यांच्या सामाजिक कादंब-यांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. त्यांच्या या कादंब-यांचा समग्र अभ्यास करण्याच्या हेतूने प्रस्तूत विषयाची मांडणी केली आहे. मराठी सामाजिक कादंबरीचा आढावा या पहिल्या प्रकणात कादंबरीची व्याख्या, प्रकार आणि सामाजिक कादंबरीचा अर्थ यांचे स्पष्टीकरण दिले आहे. तसेच बाबा पद्मनंजी यांच्या 'यमुना पर्यटन' या सामाजिक कादंबरीपासून ते नीलम माणगावे यांच्या 'मृत्युदंड' या सामाजिक कादंबरीपर्यतचा थोडक्यात आढावा घेतला आहे. रा.ग.जाधव यांनी "कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोण व त्यांना अनुरुप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरणनिर्मीती , शैली इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजेच कादंबरी होय. अशी कादंबरीची व्याख्या केली आहे. वास्तव व कल्पित यांचा योग्य तो मेळ घालून कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण निर्मिती , घटना व प्रसंगाची यथोचित मांडणी इ. च्या सहाय्याने वास्तव चित्रित करणे म्हणजेच कादंबरी होय. असे म्हणणे अधिक संयुक्तीक ठरेल. अद्‌भूतरम्य पौराणिक, ऐतिहासिक, संज्ञाप्रवाही , सामाजिक इ. कादंबरीचे प्रकार आहेत. त्यापैकी सामाजिक कादंबरीचा अर्थ लक्षात घेतला आहे. नरहर कुरुंदकरांनी " सामाजिक कादंबरी हा कलेच्या पातळीवर वर्तमान वास्तावाचा शोध असतो, आकलनाचा प्रयत्न असतो . " असे म्हटले आहे. प्रा. बापट आणि गोडबोले यांच्या मते , "

सामाजिक कादंबरी भोवतालच्या सृष्टीचे व सद्यकालीन आणि क्वचित प्रसंगी भावी समाजाचे चित्र रंगवितात. " व्यक्ती - कुटूंब - समाज या त्रयीतील हेवेदावे , संघर्ष , भावसंबंध , जीवनपध्दती, समाजाचे वेगळेपण इ. चित्रण सामाजिक कादंबरीत येते. समाज बदलतो तसा सामाजिक कादंबरीतील आशय बदलत असतो.

१८५७ मधील बाबा पद्मनजी यांची 'यमुना' पर्यटन ही पहिल सामाजिक कादंबरी होय. त्यानंतर 'नारायणराव व गोदावरी' , ' शिरस्तेदार ' , 'वेणू ', 'रंगराव' इ. सामाजिक कादंब-या प्रसिध्द झाल्या . १८५७ ते १८८७ पर्यंतची सामाजिक कादंबरी बोधवादी स्वरुपाची होती. यानंतरच्या काळात हरिभाऊ कालखंडामध्ये हरिभाऊनी 'मी' , 'पण लक्षात कोण घेतो' इ. दहा सामाजिक कादंब-या लिहील्या. याच काळात बा.सं.गडकरी , नाथमाधव , वि.वा. हडप इ. सामाजिक कादंब-या लिहिल्या आहेत. यानंतरच्या काळात श्री. व्यं. केतकर, मामा वरेरकर, पू.य.देशपांडे इ. लेखकानी सामाजिक कादंब-या लिहीलेल्या दिसतात.

विभावरी शिरुरकरांच्या 'बळी' या कादंबरीतून मांगगारुडी समाजाच्या वास्तव चित्र रेखाटले गेले आहे. बा.भ. बोरकरांची 'भावीण', रणजीत देसाई यांची 'बारी' , श्री.ना. पेंडसे यांची 'रथचक्र' इ. सामाजिक कादंब-यामधून विविध प्रकारचे समाज चित्रण पहावयास मिळते.

१९६० नंतर ग्रामीण, दलित इ. साहित्य प्रवाह विकसित झाले. आण्णाभाऊ साठे , बाबूराव बागूल बाबूराव गुरव, नामदेव ढसाळ, शंकरराव खरात, दया पवार, शरणकुमार लिंबाळे , लक्ष्मण गायकवाड इ. नी आपल्या कादंब-यामधून दलित समाजाचे दु:ख, वेदना, विद्रोह व्यक्त केला. ग्रामीण कादंबरीकार व्यंकटेश माडगुळकर, उद्धव शेळके , आनंद यादव , शंकर पाटील, मोहन पाटील, सदानंद देशमुख, पुरुषोत्तम बोरकर अशा अनेक लेखकांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण समर्थपणे केलेले दिसते. जयवंत दळवी ,भाऊ पाध्ये, अरुण साधू इ. लेखकांनी महानगरीय जीवन तसेच श.रा.भिसे , प.त्रि. सहस्त्रबुध्दे , मधूकर वाकूडे इ. कादंबरीकारानी आदिवासी समाजाचे

वास्तव चित्रन केले आहे. राजन खान , शकील शेख, रवींद्र शोभणे, मुनीर शेख इ. कादंबरीकारांनी मुस्लीम समाजाचे जीवन चित्रण केले आहे.

१९६० नंतर मराठी कादंबरी विविध अंगानी विकसित झालेली दिसते. मध्यमवर्गीय जीवनाबरोबरच आदिवासी , भटक्या जमाती , स्त्रिया , दलित , मुस्लीम समाजाचे यथार्थ चित्रण या काळातील मराठी कादंबरी मधून झालेले दिसते.

पुरुषांप्रमाणे स्त्री लेखिकांनीही सामाजिक कादंब-या लिहिलेल्या दिसतात. काशीबाई कानिटकरानी 'रंगराव' ही पहिली स्त्री लिखित सामाजिक कादंबरी लिहिली . ज्योत्स्ना देवधर, गौरी देशपांडे , शांता गोखले कविता महाजन इ. लेखिकांनी सामाजिक कादंब-या लिहिल्या आहेत. एकंदर कौटुंबिक , सामाजिक कादंब-याची संख्यात्मक वाढ झाली पण त्यामानाने गुणात्मक वाढ झाली नाही.

नीलम माणगावे यांच्या वाङ्मयीन कामगिरीचा परामर्श या दुस-या प्रकरणात लेखिकेचा जीवन परिचय व वाङ्मयीन परामर्श घेतला आहे. त्यांचा जन्म १मे १९५४ रोजी सांगवडे ता. करवीर, जि. कोल्हापूर येथे झाला असून त्यांचे बालपण रुकडी या गावी गेले. त्यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. त्यांचे वडील स्वार्थी स्वभावाने तापट व बेजबाबदार वृत्तीचे होते. त्या चौथीत असतांना वडील वारले . त्यांचे पहिली ते नववी पर्यंतचे शिक्षण रुकडी येथे झाले . त्यापुढील शिक्षण कोल्हापूर मध्ये झाले. देशभूषण शाळेत दहावी व महावीर महाविद्यालयात एफ.वाय.बी.ए. पर्यंतचे शिक्षण झाले. वक्तृत्व स्पर्धा, स्नेहसंमेलन , नाटक यासारख्या कार्यक्रमात त्या उत्साहाने सहभागी होत. तसेच त्यांना त्यांची आई , हरेराम , शांता यासारख्या व्यक्ती भावताना दिसतात. या व्यक्ती त्यांच्या लेखनात कोठे ना कोठे आढळतात. १९७६ साली नीलम माणगावे यांचा विवाह जयसिंगपूरच्या रमेश माणगावे यांच्याशी झाला. या नंतर त्यांच्या जीवनाला मोठे वळण मिळाले असे दिसते. त्यांनी आपल्या लेखनाची सुरुवात विवाह नंतर केलेली दिसते.

शाळा, महाविद्यालय, विविध मंडळ यामधून त्या कथाकथन व कविता वाचन करु लागल्या . अखिल भारतीय कवयित्री संमेलनामार्फत जुलै २००७ मध्ये मॉरीशस मध्ये भरलेल्या साहित्य संमेलनात त्या सहभागी झाल्या होत्या.

नीलम माणगावे यांनी 'साक्षीदार', 'तीच माती तेच आकाश' , 'शांते तू जिंकलीस' , 'ज्वालाग्रहीच्या तोंडावर', 'फटफटलंय' ... आता नक्की उजडंल', हे कथासंग्रह लिहीले आहेत. त्यांच्या कथामधून अस्पृश्यता, स्वातंत्र्य सैनिकांच्या व्यथा , मतिमंदाचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न प्रौढ कुमारीकांचे दु:ख, विधवांचे दु:ख , वेदना मांडल्या आहेत. त्यांनी एकूण पाच कादंब-या लिहिल्या आहेत. 'डायरी', 'जिद्द' , 'सोन्या' , 'शोध', 'मृत्युदंड' या कादंब-यांमध्ये त्यांनी स्त्रीचे दु:ख, अपंग स्त्रीने जिद्दीने स्वावलंबी जीवन जगणे, मूल न झालेल्या स्त्रीचे दु:ख , बालगुन्हेगारीचा प्रश्न, वेश्यांचे प्रश्न, कुष्ठरोग्यांचे जीवन, पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी ससेहोलपट इ. विविध विषय मांडले आहेत. 'जसं घडलं तसं ' हे त्यांचे आत्मकथन हृदयस्पर्शी आहे. त्यांनी 'गुलदस्ता', 'जीनज्योत' व 'जाग' असे तीन काव्यसंग्रह लिहिलेले आहेत. 'उखाण्यातून स्त्रीदर्शन' हे लोकसाहित्य प्रकाशित केले आहेत. बालसाहित्यात कथा, बडबड गाणी, कादंबरी, नाटीका लिहिलेल्या आहेत. त्यांच्या एकूण साहित्यामागची प्रेरणा ही सामाजिक जाणीव दिसते. डॉ. निर्मलकुमार फडकुले हे 'जस घडलं तसं' या आत्मकथनाविषयी लिहितात, "हे सार लेखन पूर्णपणे वास्तव आहे. कल्पनेचा यात अंशही नाही हे जाणवतं. हे हृदयस्पर्शी लेखन अनेक स्थळी डोळे ओलं करणारं आहे... या आत्मकथनांत कृत्रिमता नाही, भोगलेल्या व्यथा, वेदनांचं प्रदर्शन नाही. निखळ प्रांजळपणा आहे. आपल्या विधवा आईचे दु:ख जवळूण पाहिल्याने त्यांच्या लेखनातील विधवांचे दु:ख प्रभावीपणे येते."

तिस-या प्रकरणात नीलम माणगावे यांच्या 'शोध' या सामाजिक कादंबरीतील सामाजिक जीवन व वाङ्मयीन वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करण्यात आला आहे. 'शोध' मध्ये वेश्यांचा मागास

समाज त्याचबरोबर मध्यमवर्गीय समाजाचे चित्रण आलेले दिसते. वेश्यावस्तीत वावरणारे गुंड मवाली, दलाल, भडक मेकअप केलेल्या स्त्रिया वेश्या व्यवसाय करायला लावून पैसे कमावणा-या मावश्या यांचा एक वेगळा समाज चित्रित करण्यात लेखिकेला यश आल्याचे दिसते. आपला देहविक्रय करुन वेश्या पैसे कमवतात पण ते पैसे त्यांना गुंड, मवाली, दलाल इ. हप्ते व खोली भाडे यांना वाटण्यात जातात. त्यामुळे त्यांना पोटभर जेवणही मिळत नाही. मध्यमवर्गीय समाजातील लोक त्यांच्याशी बोलणे अप्रतिष्ठीतपणाचे मानतात. पण तरीही याच समाजातील पुरुषामुळे वेश्या व्यवसाय चालतो. वेश्यांना होणारी मुलं ही इनामदार, पाटील यांची असतात. पण त्यांना वडीलांचे नाव नसते. वेश्यांच्या संततीचाही प्रश्न लेखिकेने मांडला आहे. 'शोध' कादंबरीतील गुलाबी व शराबी या वेश्यांचे निमित्त करुन लेखिका एकूण वेश्यांचे दु:ख मांडताना दिसतात. वेश्यांची यल्लमा देवीवर श्रध्दा असते.

मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजातील कविता ही गृहिणी असून गुलाबी व शराबीला ती मदत करू इच्छिते पण तिला अनेक बंधने व मर्यादा येताना दिसतात. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे कविता गुलाबी व शराबीला कोंडमारा सहन करावा लागतो. लेखिका वेश्यांच्याबरोबरच विवाहित स्त्रियांच्या दु:ख व वेदनांचा वेध घेताना दिसते. घर शोधणारी वेश्या व घर नावाच्या उबदार घरट्यात रहाणारी मी यात फरक कुठे आहे? असा प्रश्न त्यांना पडताना दिसतो. नवरासुध्दा बलात्कार करत असतो असा विचार मांडून त्या वाचकांना अंतर्मुख करतात. स्त्रिया वेश्या व्यवसायाकडे का वळतात हे सांगताना लेखिकेने स्वतंत्र चिंतन केलेले दिसते. वेश्यांनी लग्न करुन संसार करायचे म्हटले तर समाज त्यांना स्वीकारत नाही. दयानंदने गुलाबीशी विवाह केला पण त्याच्या घरातील व समाजातील व्यक्ती गुलाबीला सर्वसामान्य जीवन जगू देत नाहीत. एकट्या, असहाय्य दुर्बल गुलाबीवर पोलीस बलात्कार करतो तर सातवीत शिकणा-या शराबीवर हेडमास्तर बलात्कार करतो. अशा घटना समाजात घडत असतांना पहात असतो. देहविक्रय करता करता

शराबी एड्ससारख्या महारोगाला बळी पडते. जेंव्हा शरीर निकामी होते देह विक्रय करायला असमर्थ ठरते. अशा वेळेस त्यांना एकतर भीक मागावी लागते अथवा आत्महत्या करावी लागते. गुलाबी व शराबीनांही शेवटी आत्महत्याच करावी लागली आहे. ' शोध' मधील वेश्यांचे विदारक जीवन वाचतांना वाचकांचा वेश्यांकडे पहाण्याचा दुष्टीकोण बदलताना दिसतो.

'शोध' मधील वाङ्.मयीन वैशिष्ट्ये अभ्यासताना कथानक , व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती इ. चा अभ्यास केला आहे. शोध कादंबरीचे कथानक ओघवते असून शेवट कथानकाला अनुरुप आहे. मात्र मध्य मात्र काहीसे लांबलेला वाटतो. विशेषता कविताने गुलाबीचा शोध घेताना आलेले निवेदन काहीसे पाल्हाळीक वाटते. कविता , कविताचा नवरा , गुलाबी, मावशी , गुरु , अपर्णा, सानंद या व्यक्तिरेखा सरस उतरल्या आहेत. पण शराबी ही व्यक्तिरेखा काहीशी अस्वाभाविक वर्तन करताना दिसते. सातवीत शिकणारी शराबी प्रौढ व्यक्तिंप्रमाणे बोलताना दिसते. वेश्यांच्या वस्तीतील दहशतीचे, गलीच्छ वातावरण समर्थपणे माणगावे चित्रित करतात. मध्यवर्गीय कुटुंबातील सुखदुःखे , संघर्ष, ताणतणाव यांचे चित्रणही लेखिका उत्तमरित्या करते. लेखिकेची निवेदनशैली प्रभावी असून सोपी भाषा, उपमा, संस्कृत तसेच इंग्रजी शब्दांचा औचित्यपूर्ण वापर यामुळे आशयाला उठाव प्राप्त झालेला आहे. प्रसंग आणि घटनांचे चित्रण प्रभावीपणे केले गेलेले आहे. मावशीला गुलाबीला घरा बाहेर काढणे, दयानंदशी तिचे लग्न, गुलाबी व शराबीवरील बलात्काराची घटना , त्यांचा आत्महत्येचा प्रसंग या घटना कादंबरीत ठळकपणे चित्रित झालेल्या दिसतात.

'चक्र', 'माहिमची खाडी', 'वासूनाका', 'भंडारभोग', 'झोंबी', ' चौंडकं' यासारख्या कादंबऱ्यांमधून देवदासी व वेश्यांचे चित्रण आलेले आहे. नीलम माणगावे यांनी मात्र विस्ताराने हे चित्रण केलेले दिसते.

चौथ्या प्रकरणात मृत्यूदंड या सामाजिक कादंबरीतील समाजजीवन व वाङ्मयीन वैशिष्ट्ये यांचा अभ्यास केला आहे. ही कादंबरी जैन समाजाच्या पार्श्वभुमिवर लिहिलेली दिसते. विमलाबाईंचे जैन कुटुंब व त्यांच्यातील धार्मिकता याचबरोबर कुष्ठरोग्यांचे जीवन चित्रण आलेले दिसते. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला सहन करावा लागणारा अन्याय, छळ व त्यामुळे स्त्रीला भोगावे लागणारे दुःख , व्यथा याचे दर्शन घडलेले दिसते.

'मृत्युदंड' कादंबरीच्या नायिका विमलाबाई लग्नाच्या चाळीस वर्षे संसार केल्यानंतर कमलाकरांच्या स्वभावाला कंटाळून स्वतंत्र राहू इच्छितात. कमलाकर मानसशास्त्राचे प्राध्यापक असूनही विमलाबाईचे मन समजू शकत नाही. ते विमलाबाई त्यांची मुलें व सुना यांच्यावर वर्चस्व गाजवताना दिसताना लेखिका पुरुषप्रधानसंस्कृतीचे दर्शन घडवून स्त्रीला कुटुंबात व समाजात कसे दुय्यम स्थान मिळते हे सांगताना दिसतात. विमलाबाई जैन धर्मातील रीतीरिवाज पाळताना दिसतात. त्यांचे मंत्र जपणे, मंदिरात जाऊन मैनासुदरी आख्यान ऐकणे इ. मधून जैन धार्मिकतेचे चित्रण होताना दिसते. सूर्यास्तापूर्वी जेवण्याला व्हासा म्हणतात. इलदारी, चरु, अष्टक, अरिहंत, महावीर इ. चे संदर्भ जैन समाजाचे चित्रण करतांना दिसतात.

'मृत्युदंड'मध्ये जैन समाजाबरोबरच कुष्ठरोग्यांचे जीवनचित्रणही आलेले आहे. कुष्ठरोग्यांचा राहण्याचा अर्थार्जनाचा, शिक्षणाचा प्रश्न, संततीचा प्रश्न इ. विविध प्रश्न त्यांनी मांडलेले दिसतात. त्या कुष्ठरोग्यांच्या वसाहतीत जाऊन तेथील जीवनाचे सुक्ष्म निरीक्षण करून त्यावर चिंतन केलेले आहे. म्हणूनच त्यांना कुष्ठरोग्यांचे जीवन प्रभावीपणे मांडता आले असे दिसते. विमलाबाईने कुष्ठरोग्यांना मदत करण्यासाठी केलेले प्रयत्न व त्यांच्या कुटुंबातून झालेला विरोध याचे चित्रण केलेले दिसते.

पुरुषधार्जिण्या समाजव्यवस्थेत विमलाबाई व संध्या यांची होणारी ससेहोलपट याचे प्रभावी चित्रण घडलेले दिसते. 'मृत्युदंड' कादंबरीचे कथानक नायिका प्रधान आहे. विमलाबाई , संध्या , सुरेश, शैलेश, दीपा, धनंजय, तळीराम, सुमनदेसाई या व्यक्तिरेखा रेखाटण्यात त्यांना यश आले आहे. पण कमलाकरांची व्यक्तिरेखा रेखाटताना काही मर्यादा पडलेल्या दिसतात. कमलाकर अतिशय दृष्ट,स्वार्थी , आपमतलबी विक्षिप्त दाखवून विमलाबाईबद्दल लेखिकेला सहानुभूती मिळवून द्यायची आहे असे वाटते. म्हणूनच त्यांनी कमलाकरांच्या दुर्गुणांचाच विचार केलेला दिसतो. तसेच त्यांच्या लेखनात पुनरावृत्तीचा दोष आढळतो. धर्म म्हणजे काय? या विषयावर भाष्य करतांना पुनरावृत्ती झाल्याचे दिसते. त्यांची पात्रे त्यांच्या म्हणण्यानुसार चालताना दिसतात. उदा. कमलाकर विमलाबाईवर जेंव्हा कुष्ठरोगी झाल्याची आवई उठवतात तेंव्हा "कुष्ठरोग मला नाही त्याच्या मेंदूला झालाय, सडलाय त्यांचा मेंदू कुजलाय... " अशा प्रकारचे विचार विमलाबाईंच्या मनात येतात. अगदीच हेच विचार सुरेशही बोलून दाखवताना दिसतो. तसेच विमलाबाईंच्या मनात बाबा आमटेनी जे कार्य केले ते आपण करु असे विचार येतात. हेच विचार सध्यांच्या संवादात येतांना दिसतात. अशा कांही मर्यादा दिसून येतात.

पाचव्या प्रकरणात नीलम माणगावे यांच्या सामाजिक कादंब-याची वैशिष्ट्ये अभ्यासली आहेत. इतर सामाजिक कादंबरीकारांमध्ये नीलम माणगावे यांचे स्थान व वेगळेपण अभ्यासून वाचकांच्या प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत. त्याचबरोबर त्यांच्या लेखनातील मर्यादा, टीका यांचाही विचार केला आहे. त्यावरून त्यांच्या वाड्.मयीन वैशिष्ट्यांचा परामर्श घेतला आहे. ' शोध ' व 'मृत्युदंड ' च्या अनुषंगाने स्त्रियांचे शोषण, माणूसकीचा -हास, वेश्यांना व गृहिणींना दिली जाणारी वागणूक, स्त्रियांच्या समस्या यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

बाबा पद्मनजी यांची 'यमुना पर्यटन', हरिभाऊंच्या 'मी ', 'पण लक्षात कोण घेतो'इ. सामाजिक कादंब-याचा नामनिर्देश करुन काशीबाई कानिटकरांची 'रंगराव,'

विभावरी शिकरकर 'बळी' या सामाजिक कादंबरीचा नामोल्लेख केला आहे. गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, शांता गोखले इ. लेखकांच्या कादंब-यांत मध्यमवर्गीय , उच्च मध्यमवर्गीय यांच्या भावविश्वातील गुंतागुत तसेच सामाजिक आशय चित्रित केलेला दिसतो. नीलम माणगावे यांच्या कादंबरीतील स्त्री पारंपरिक पध्दतीने जीवन जगताना दिसते. पण परंपरेला छेद देऊ इच्छिते. तसेच घराबाहेर पडून समाजाला आपला काहीतरी उपयोग व्हावा. समाजासाठी आपण काहीतरी करावे यासाठी धडपड करताना दिसतात. तसेच त्यांच्या कादंबरीतील स्त्री सोशिक, हळवी मनोवृत्ती असलेली ज्याप्रमाणे आहे त्याप्रमाणे स्वतःच्या अस्तित्वाचे स्थान असलेली, स्वातंत्र्यासाठी धडपडणारी स्त्रीदेखील आहे. डॉ. उत्तम, सुमन देसाई, अपर्णा सारख्या स्त्रिया पुरोगामी, स्त्रीवादी विचार मांडताना दिसतात.

पुरुषप्रधानसंस्कृतीचे दर्शन त्यांच्या ' शोध ' व 'मृत्युदंड' मधील विमलाबाई या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मांडले आहे असे दिसते. मूळ कथानकाला धरुन माणूसकीचा -हास, लोकसंख्या वाढ, भ्रष्टाचार, झोपडपट्टया पाडून त्याठिकाणी इमारती बांधणारे बिल्डर, अंधश्रध्दा इ. सामाजिक समस्या येताना दिसतात.

नीलम माणगावे यांच्या लेखनाबद्दल अनेकांनी पत्राद्वारे , अनुकूल व प्रतिकूल प्रतिक्रिया , अभिप्राय व्यक्त केलेले आहेत. तसेच नियतकालीक , मासिकामधून समीक्षणे , परीक्षणे आलेली आहेत. त्यांचाही विचार या प्रकरणात केलेला आहे. डॉ. प्रभा मगदूम यांनी म्हटले आहे, 'त्यांची शैली साधी असून हृदयाला भिडणारी आहे.' डॉ. शैलजा यादवाड यांनी 'जीवनाची भयानक वास्तविकता मांडण्याचा भरकस प्रयत्न करुन वेश्यांच्या पूनर्वसनासाठी काय करता येईल याचाही मार्ग सूचविला आहे. ' असा अभिप्राय व्यक्त केला आहे. उषा परब यांनी ' लेखिकेची भाषा साधी सरळ असून , उत्सुकता वाढविणारी आहे. ' असे म्हटले आहे. तसेच ' थोडा प्रचारात्मक आवेश जाणवतो. ' असेही मत व्यक्त केलेले आहे. डॉ. जी.पी. माळी यांनी 'नीलम माणगावे यांना आव्हानात्मक विषय हाताळून धगधगत्या वास्तवावर प्रकाश टाकण्याची तळमळ आहे' असे म्हटले आहे.

म.द. हातकणंगलेकरानी 'त्यांचे अलीकडचे लेखन समाधानकारक होत आहे. त्यांचा साहित्यिक कार्यक्रमालील सहभाग उल्लेखनीय आहे. ' असे सांगून त्यांचे कौतुक केले आहे. त्याचबरोबर 'शोध' कादबरीविषयी प्रक्षोभक विषय धीटपणे सहानुभूतीने मांडला आहे. भाषा परखड वास्तवदर्शी आहे. प्रसंगाची रचना नाटयमय आहे. शेवट परिणामकारक आहे. मात्र मध्यंतरीच्या शोधाची हकिकत लांबलेली आहे. तो भाग ' रेंगाळतो.' अशा मर्यादा सांगून त्यांचे अभिनंदन देखील केले आहे. नीलम माणगावे स्त्रीवादी लेखन करतात. त्याचबरोबर त्यांचे लेखन सामाजिक जाणिवेतून झालेले दिसते. सामाजिक बांधिलकी मानणा-या माणगावे समाजाला प्रबोधन करू इच्छितात असे जाणवते. त्यांच्या लेखनातून त्या सामाजिक समस्या मांडताना दिसतात. विशेषतः स्त्रियांचे शोषण, पुरुषधार्जिण्या समाजव्यवस्थेत स्त्रीची होणारी परवड, ससेहोलपट, कुंचबणा त्या आपल्या लेखनात चित्रित करताना दिसतात. तसेच त्यांना आपण कमवत नाही याचे दुःख आहे. दोघींनाही समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा आहे. माणगावे व व्यक्तिरेखा यांच्यात खूप साम्य दिसते. विमलाबाई व कविता या व्यक्तिरेखावर लेखिकेची गडद छाया असल्याचे जाणवते. नयना आचार्य, कुसूम अभ्यंकर, योगिनी जोगळेकर, शुभदा गोगटे, मंदाकिनी भारद्वाज , सुमन भडभडे इ. कादंबरीकारांच्या कादंब-या दरमहा बाजारात येतात. कोणत्याही प्रश्नाच्या मूळाशी न जाता या लेखिकांनी भावूक हळव्या आणि उथळ शैलीतून विविध विषय हाताळताना दिसतात. लेखिका माणगावे याच पध्दतीने लिहित असल्यातरी नीलम माणगावे आपल्या कादंबरीत प्रणय चित्रण, प्रेमाचा त्रिकोण याचे वर्णन करत नाही. केलेच तर ते कदाचित प्रासंगिक व अत्यंत संयमाने लिहिताना दिसतात. त्यांच्या लेखनावर खांडेकर, सानेगुरुजी यांच्या लेखनाचा प्रभाव जाणवतो. नयना आचार्य, कुसूम अभ्यंकर यांसारख्या लेखिकापेक्षा नीलम माणगावे वेगळया वाटेने जाताना दिसतात. सामाजिक जाणिवेतून लिहिताना दिसतात. समीक्षकानी त्यांच्या लेखणाची म्हणावी तेवढी दखल घेतली नाही हे त्यांच्यावर अन्यायकारक आहे. अगदी दखल न घेण्यासारखे त्यांचे लेखन नाही.

# संदर्भ-सूची


१. अदवंत, म. ना. : 'हरिभाऊ विविधदर्शन', मोघे प्रकाशन, हरिभाऊ पुर्वकालीन मराठी कादंबरी स्वरूप, सामर्थ्य आणि मर्यादा, पृ. क्र. ४४.

२. कुलकर्णी, श्री. मा. : 'कादंबरीची रचना', प्रस्तावना, उन्मेष प्रकाशन, नागपूर., प्र. आ. १९७६, पृ. क्र. १३.

३. कुलकर्णी, वा. ल. : 'हरिभाऊंची सामाजिक कादंबरी', पृ. क्र. १३३.

४. कुरूंदकर, नरहर. : 'धार आणि काठ', 'देशमुख आणि कंपनी', पुणे, प्र. आ. १९७१, पृ. क्र. ३७.

५. कोकाटे, गुंफा. : 'स्त्रीवादी समीक्षा दृष्टीतून सानियाचे साहित्य', 'नवभारत', फेब्रुवारी, २००७.

६. खोले, विलास. : 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी', लोकवाङ्मयीन गृह, मुंबई, २००२, पृ. क्र. १४०.

७. जाधव, रा. ग. : 'साहित्य व सामाजिक संदर्भ', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ. आ. २००३, पृ. क्र. ७४.

८. जोग, रा. श्री. : 'प्रदक्षिणा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, आ. ६ वी, पृ. क्र. २११.

९. डॉ. कुलकर्णी, म. द. : 'मराठी कादंबरी तंत्र आणि स्वरूप', मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. क्र. ८.

१०. डॉ. ठाकूर, रवींद्र. : 'मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समालोचन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, पृ. क्र. २२२.

११. डॉ. बिरासदार, वसंत. : 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ. क्र. २१३.

१२. डॉ. माळी, जी. पी. : 'वेली आणि फुले', अक्षरदीप प्रकाशन, कोल्हापूर., प्र. आ. २००७, पृ. क्र. २४.

१३. डॉ. यादवाड, शैलजा. : 'शोध एका हरवलेल्या वेश्येचा!', रविवार दि. २ एप्रिल २००६.

१४. डॉ. सोमण, अंजली. : 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८९, पृ. क्र. ९०.

१५. देशपांडे, कुसूमावती. : 'मराठी कादंबरी : पहिले शतक' (१८५०-१९५०), मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, पृ. क्र. १००.

१६. परब, उषा. : 'शोध' वेश्या जीवनाचे दारूण वेदनेचे जिवंत चित्रण', आरती मासिक, सी. श्री. उपाध्ये (संपा.)

१७. पाटील, विजय. : 'वेश्या व्यवसायाची नवी दुनिया', प्रतापसिंह जाधव (संपा.), दै. पुढारी ०३ एप्रिल २००८.

१८. प्रा. बापट, प्र. वा. आणि गोडबोले ना. वा. : 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास', व्हिनस प्रकाशन, पुणे. पृ. क्र. १६८.

१९. भंडारी, शांतिलाल : 'तारका', त्रैमासिक, मे/जून/जुलै २००६, पृ. क्र. ५३.

२०. माणगावे, नीलम. : 'शोध', सुकृत प्रकाशन, सांगली. प्र. आ. २००५. पृ. क्र. १५९.

२१. 'स्त्री साहित्याचा मागोवा', खंड २, पृ. क्र. १९४. (संपादित)

२२. हर्डीकर, प्रभा. : आपल्या वाचनालयात (सदर)

परिशिष्टे

# लेखिकेची प्रदीर्घ मुलाखत

**मी :-** मॅडम, तुमच्या जन्म व बालपणाविषयी काही सांगा?

**लेखिका :-** माझा जन्म सांगवडे या गावी झाला. माझे बालपण म्हणजे सातवीपर्यंतचे आयुष्य सांगवडे आणि रूकडी या माझ्या गावी गेले. माझे वडील मी पाचवीत असताना गेले, त्यानंतरचे जीवन अतिशय भितीदायक, क्लेषकारक वातावरणात गेले. माझी विधवा तरूण आई आणि आम्ही तिन्ही बहिणी (मोठीचे तेव्हा लग्न झाले होते.) मामा सोबत होते, परंतु सुरक्षिततेच्या दृष्टिने बुजगावण्या एवढाच झाला. कारण भाऊबंदकीतून निर्माण झालेल्या समस्यात त्यांचा उपयोग फारसा होत नव्हता. म्हणजे लोक त्यांना जुमानत नव्हते. प्रसंगी मारायला धावायचे. एकुणच बालपणातल्या निर्व्याज आनंद उपभोगता आलाच नाही. मात्र प्रत्येक सुट्टीत आजोळी गेलेले बालपण छान गेले. आजी, माझे मामा (एकूण पाच) आणि मामी यांच्या लाडा-कोडातील बालपण मी विसरू शकत नाही. बालपणी पाहिलेला समाज, त्याची मनोवृत्ती, विधवेला त्रास देण्याची त्यांची मानसिकता आणि आमच्या घरासमोर (आमच्याच अंगणात) असलेली तालीम.... तालमीतली मुलं.... त्यांचा आचरटपणा.... त्यांची दहशत... त्यातून निर्माण झालेली भीती.... प्रस्थापितांनी माझं बालपण खाऊन टाकलं.

**मी :-** तुमच्या शिक्षणाविषयी थोडक्यात कसे सांगता येईल?

**लेखिका :-** माझं प्राथमिक शिक्षण रूकडी येथील कन्या विद्यामंदीर या प्राथमिक शाळेत झालं. आठवी-नववी रूकडीमधीलच रयत शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यालय या हायस्कुलमध्ये झालं. त्या दरम्यान मी वयात आले. इकडं तालीममधील मुलांचा आचरटपणा शिगेला पोहोचला होता. (जसं घडलं तसं या माझ्या आत्मकथनात सविस्तर वृत्तांत आहे.) त्या मुलांना घाबरून आईने मला कोल्हापुरला मामांकडे शिक्षणासाठी पाठवले. दहावी-अकरावी (पूर्वीची एस.एस.सी.) देशभूषण हायस्कुलमध्ये झाले. नंतर पी.डी., बी.ए. पहिलं

आणि दुसरं वर्ष महावीर कॉलेज या महाविद्यालयात झाले. एस. वाय. परीक्षेनंतर लग्न झाले आणि शिक्षण थांबले. लग्न होईपर्यंत मुलीला शिकवायचं अशा मानसिकतेतून झालेलं शिक्षण... एवढाच शिक्षणाच अर्थ होता.

**मी :–** तुमच्या कुटुंबाविषयीची माहिती द्या?

**लेखिका :–** माझ्या वडिलांचं मूळ गाव कोरोची (ता. हातकणंगले). वडील रूकडीला दत्तक आलेले. माझ्या आईच्या लग्नाआधी (आई वडिलांची दुसरी बायको) वडिलांनी त्यांच्या सासूचा खून केला होता. त्यानंतर त्यांची पत्नी बाळंतपणात वारली. वडिलांची शिक्षा संपल्यानंतर माझ्याबरोबर त्यांचं लग्न झालं. नंतर आम्ही तिघी जन्मलो. वडील तसे पुरूष परंपरावादी. आईला त्यांनी खूप त्रास दिला. पाचवी सातवीपर्यंत त्यांचं शिक्षण झालेलं होतं. निरक्षर होती. तरी तिला वाचता येत होतं. लिहीता येत नव्हतं. मोठी बहीण पाचवीपर्यंत तर मधली बहीण सातवीपर्यंत शिकली. घरात धार्मिक वातावरण...आईचा ओढगस्तीचा संसार... पाटील घराण्यामुळे आलेला बंदीस्तपणा... चाली-रिती-रूढी-परंपरा ... एकूणच कर्मठ म्हणण्याएवढा धार्मिकतेचा पगडा. अर्थातच देव आणि भूताखेतांचा प्रभाव अधिक.. तरीही... आईच्या जगण्यातला धीटपणा... प्रसंगाला सामोरे जाण्याचा कणखर बाणा आश्चर्यात पाडणारा.

**मी :–** तुमच्या आयुष्यातील एखादा अविस्मरणीय प्रसंग सांगता येईल का?

**लेखिका :–** मी लिहायला लागले. व्यथा एका आत्म्याची ही पहिली कविता लिहीली.. आणि लिहू लागले... आयुष्याचा हा टर्निंग पॉईंट आणि पहिल्या कथासंग्रहाला साक्षीदार बाबूराव बागुल पुरस्कार मिळाला. एका सर्वसामान्य स्त्रीला असा पुरस्कार मिळाला. मला माझी आयडेंटी मिळाली. ही घटनाच अविस्मरणीय आणि माझ्यादृष्टीने खूप महत्त्वाची. आई म्हणजे माझं सर्वस्व... माझी प्रेरणा... ती सतरा जानेवारी २००८ ला गेली... तो दिवस ... ती रात्र मला कधीही विसरता येणार नाही. पोरकेपणाची भावना काय असते? हे जाणून मन हळवं होतं... याचं विस्मरण होणं अशक्यचं!

**मी :–** मॅडम, वाचनाविषयी तुमचे मत काय आहे?

**लेखिका :-** वाचन ही माणसाला... आणि फक्त माणसालाच मिळालेली देणगी आहे. अक्षराचा शोध हा जणू ज्ञानविस्ताराचा पाया आहे. रूढार्थी अक्षरवाचन तर आहेच पण अक्षरांबरोबरच नव्हे तर त्याहीपेक्षा जास्त वाचन माणसाचं व्हायला हवं. माणूस समजून घेणं म्हणजेच माणूस वाचणं! त्याचा परीघ, त्याचा अवकाळा, त्याच्यावर होणारा सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक आणि वैचारीक आघात समजून घ्यायला मला आवडतं. माणसं कशी वागतात? कशी जगतात? कशी घुसमटतात, रडतात-चिडतात, वैतागतात, एकमेकांना फसवतात, अडवतात, लुबाडतात पण तरीही एकमेकांसाठी जगतातही... आनंदात राहण्याचा प्रयत्न करतात. हे त्यांना कसं जमतं? यामागची प्रेरणा कोणती? एवढी शक्ती त्याना कोठून मिळते? हे वाचन... पाहणं... अनुभवणं... आणि त्यातूनच शिकत जाणं हे मला आवडतं. लिहीण्याची प्रेरणाही त्यातूनच मिळते. पशु-पक्षी, प्राणी, जमीन, आकाश, झाड-झुडपं, पर्वत, डोंगर, समुद्र, नद्या, नाले ही महाग्रंथांची पानचं असतात नाही का?

**मी :-** तुमचं वाचन प्रचंड आहे त्याविषयी...

**लेखिका :-** सुरूवातीच्या काळात चांदोबा मासिकाच्या काळानंतर बाबुराव अर्नाळकर, चंद्रकांत काकोडकरांपासून, वि. स. खांडेकर, ना. सी. फडकेपर्यंत... मिळतील ती पुस्तके वाचली. नंतर मात्र जाणीवपूर्वक वाचली ती आत्मकथनं... लक्ष्मण माने यांचा उपरा वाचला, दया पवारांचं बलुतं वाचलं, अशोक व्हटकरांच बगाड वाचलं, मेहरून्नीसा दलवाईंचं मी भरून राहिली आहे हे वाचलं. मिळून साऱ्याजणी, साधना, आजचा सुधारक, प्रबोधन प्रकाशन ज्योती, अंधश्रध्दा निर्मूलन वार्तापत्र... वगैरे मासिकांबरोबरच तीर्थंकर आणि प्रगती, जीनविजय सारख्या जैन वार्तापत्रांचं वाचन आहे. विश्वास पाटलांची झाडाझडती, पु. ल. देशपांडे यांची व्यक्ती आणि वल्ली, तस्लीमा नसरीनचा फेरा, गौरी देशपांडे यांची एक एक पान गळावया, मॅक्झीम गॉर्कीची आई.. अशी अनेक... ही यादी देणं अवघडं आहे. नव्या-जुन्या अनेक लेखक कवींचे साहित्य वाचले आहे.

**मी :-** मॅडम तुमचे आवडते साहित्यीक कोणते?

**लेखिका :-** असं निश्चित सांगता येणार नाही. प्रत्येक लेखकाच्या साहित्यात आवडणारं-भावणारं काही ना काही असतंच. गौरी देशपांडेच्या कथा विचार करायला लावतात. नात्यांचा तळ उपसतात. लक्ष्मण माने, दया पवार, विश्वास पाटील आणि अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यातून तळागाळातील माणूस... त्याचं जगणं आणि मरणं सुध्दा समोर दिसतं. तळागाळातली माणसं सुध्दा माणसंच असतात आणि आपणही माणसंच आहोत. मग माणसामाणसांत एवढा फरक का? उर्मिला पवार यांचं 'प्रदान' वाचल्यानंतर सुन्न व्हायला होतं. आपण कुठं अन् का आहोत? आणि तळागाळातील लोक तिथंचं का आहेत? याचा विचार करायला हे साहित्य शिकवतं. आजही माणूस जन्मानेच लहान-मोठा ठरवला जातो. कर्तृत्वाला आजही सन्मान दिला जात नाही... ही जाणीव उध्वस्त करण्याची प्रक्रिया अशा वाचनातून सुरू होते.. यामुळे मला स्वत:ला समजावून घ्यायला त्याचा उपयोग होतो.

**मी :-** तुमचे वैवाहीक जीवन व लेखन यांचा परस्परसंबधआहे का?

**लेखिका :-** कोणत्याही जीवनाचा लेखन प्रक्रीयेशी संबंध असतोच, तसा तो वैवाहीक जीवनाचाही आहे. आमचं मोठं कुटुंब... संख्या जवळजवळ४०/४५... कित्येक वर्षे आमच्या सात जावांचा संसार एकत्रच होता. बालवाडीपासून कॉलेजपर्यंतची मुलं/मुली आमच्या कुटुंबात असायची/आजही आहेत. अर्थातच सर्व वयोगटातील (वय वर्ष सहा महिने ते वय वर्ष ऐंशी) आणि विभिन्न स्वभाव वैशिष्ट्यांच्या लोकांचा सहवास आमच्याच कुटुंबातून मिळाला. साहित्यनिर्मितीत याचा निश्चितच उपयोग होतो. कुठे ना कुठे पात्रामध्ये त्याची सरमिसळ होते. नाती समजावून घेवून ती साहित्यात मांडायला याचा खूपच उपयोग झाला.

**मी :-** पतीचे आपल्या लेखनात सहकार्य लाभते का? कोणत्या प्रकारचे?

**लेखिका :-** मला लेखनाची खरी स्फूर्ती माझ्या पतीमुळेच मिळाली असे म्हणायला सबळ कारण आहे. लग्नाआधी मी काहीच लिहीले नव्हते. निबंधवगैरे छान लिहायची शाळेत पण पुढे साहित्यनिर्मिती करीन असं ध्यानी मनीही नव्हतं. वाचनाची आवड होती बस्स! माझ्या मिस्टरांना वाचनाची आवड खूप आहे. विशेषत: वैचारीक पुस्तक जास्त वाचतात. आधी

आधी ते जयसिंगपूर येथे होणाऱ्या साहित्यसंमेलनाला मला घेऊन जायचे. संमेलनातील सहभागी साहीत्यिकांचा माझ्यावर खूप परिणाम झाला. कुठंतरी आत स्फुलिंग चेतवलं गेलं आणि मी लिहू लागले. वेगवेगळी पुस्तकं आणणं... वार्तापत्रांच्या पुरवणीमधील महत्त्वाचं काही चांगल असेल तर ते मला दाखवणं... वाचायला सांगणं... एखाद्या पात्राबद्दल मला काही चर्चा करावीशी वाटली तर ती करणं... एखाद्या कवितेचा शेवट न पटल्यास सांगणे... कार्यक्रमासाठी जायला प्रोत्साहन देणे वगैरे गोष्टीत त्यांचे सहकार्य असते. जे महत्त्वाचे असते... त्याशिवाय जेव्हा जेव्हा मी जैन समाजामधील काही अनिष्ठ घटनाविरोधी लिखाण करते तेव्हाही त्यांचा भक्कम पाठींबा असतो. शासन नावाची जैन कथा (जी जैन मुलींच्या चारित्र्यावर बोट ठेवणारी आणि शेवटी दिगंबर मुलींना कपडे घालणारी आहे... ) लिहीली तेव्हा तीर्थंकरमध्ये कथाप्रसिध्द करण्याआधी संपादक श्रेणीक अन्नदाते यांनी मला विचारले की कथा प्रसिध्द झाल्यानंतर समजा तुमच्या घरावर मोर्चा आला किंवा दगडफेक झाली तर तुमची तयारी आहे काय? क्षणभर मी गडबडले कथा प्रसिध्दीसाठी परवानगी दिली मग नवऱ्याला सांगितले. तेव्हाही ते म्हणाले कथा प्रसिध्द तर होऊ दे मग पाहू काय करायचे! म्हणजे नैतिक धैर्य देऊन कार्यप्रवण करण्यासाठी लिहीण्याचं धाडस त्यांनी आणि घरच्यांनी नेहमीच निर्माण केलेलं आहे.

**मी :-** आपल्या व्यक्तिगत जीवनातील अनुभवांचा साहित्यावर किती परिणाम झाला आहे?

**लेखिका :-** कोणतीही साहित्य कलाकृती पूर्णत: काल्पनिक नसते. त्याला अनुभवाची जोड द्यावी लागते. माझ्या व्यक्तिगत जीवनातील अनुभवांचा साहित्यावर खूप मोठा प्रभाव आहे. जे मी पाहते, ऐकते, अनुभवते तेच लिहीते. त्याचा अवकाश व्यापक असतो. इतर व्यक्तिरेखांचा त्याच्यावर प्रभाव असतो. किंवा माझ्या वैयक्तिक अनुभवांचा सरमिसळ दुसऱ्या व्यक्तीवर होत असते. वास्तव आणि कल्पना यांची सांगड घातल्याशिवाय साहित्यकृती निर्माण होऊ शकत नाही. किमान माझी तरी.

**मी :-** मॅडम, तुम्ही समीक्षणात्मक लेखन केले आहे का?

**लेखिका :-** काही स्त्री व्यक्तिरेखांचा स्त्री जाणीवेच्या दृष्टिकोनातून समिक्षणात्मक लेखन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदा. द्रौपदी, रेणुका, शकुंतला, वेण्णाबाई, भानुमती, मनोरमा, अक्कलमहादेवी, जगन्नाथ पत्नी लक्ष्मी, लोककथेमधील आणि एका चिनी कथेमधील स्त्री... अशा दहा स्त्रियांचा विचार या लेखनामध्ये केलेला आहे. विविध दिवाळी अंकामधून ते प्रसिद्ध झाले आहेत.

**मी :-** तुमच्या ग्रंथसंग्रहाविषयी काय सांगाल?

**लेखिका :-** आमच्याकडे बऱ्यापैकी चांगला ग्रंथसंग्रह आहे. ललित, वैचारिक, सामाजिक आशय असलेली अनेक पुस्तके संग्रहात आहेत. जवळ जवळ १५००/१६०० पुस्तकांचा संग्रह आमच्याकडे आहे. आत्मकथन, चरित्रग्रंथ, अण्णा भाऊ साठेंचं निवडक वाङ्मय, आ. ह. साळुंखे यांची जवळ जवळ सर्व पुस्तके संग्रही आहेत. तारा भवाळकर, आश्विनी धोंगडे, अरूणा ढेरे, सुधा मूर्ती, डॉ. अनिल अवचट, आशा बगे, बाबा भांड, डॉ. निर्मलकुमार फडकुले, इंदिरा संत, सुरेश भट, कुसूमाग्रज, रा. रं. बोराडे... नामनिर्देशन करणं अवघड आणि अशक्य आहे. त्याशिवाय मिळून साऱ्या जणी, साधना, आरती, जनस्वास्थ्य, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र, प्रबोधन प्रकाशन ज्योती, आजचा सुधारक तीर्थंकर, द. महाराष्ट्र सा. वादीका, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, प्रगति आणि जिनविजय... आणखी कितीतरी मासिकं येतात. सकाळ, पुढारी, तरूण भारत, लोकसत्ता, लोकमत सारखीच वर्तमानपत्रं समाजाची वास्तवता स्वच्छ, स्पष्ट दाखवतात.

**मी :-** मॅडम, तुम्हाला साहित्य लेखन केल्यानंतर काय अनुभव येतो?

**लेखिका:-** साहित्य लेखनानंतर मनावरचा ताण कमी होऊन मन मोकळं झाल्यासारखं वाटतं. पण हे असं नेहमीच होतं असं नाही. काही वेळा लेखनानंतर खूप अस्वस्थता येते. जेव्हा लेखनानंतर प्राप्त परिस्थितीत आपण... पांढऱ्यावर काळं करण्याशिवाय जास्त काही करू शकत नाही, ही भावना खूप अस्वस्थ करते. साहित्य हा समाजाचा आरसा समजतात. पण कधी कधी वाटतं. फक्त आरसा दाखवून काय उपयोग? समाज बदलायला हवा. जेव्हा शोध ही वेश्या जीवनावरची कादंबरी लिहून पूर्ण केली, तेव्हा किती उशीर मला रडायला येत होतं.

दिवसभर अस्वस्थ होते. वाटत होतं, कादंबरीतसुद्धा (खोटं खोटं का होईना) आपण त्यांना न्याय देऊ शकत नाही. जगण्याचे मार्ग सुलभ-सरळ करू शकत नाही, मग अशा लेखनाचा उपयोग काय? मग वाटतं, लेखनापेक्षा कार्य मोठं आहे. निष्ठेनं कार्य करणाऱ्यांचीच जास्त गरज आहे. अशा भावनेनंतर काही काळ लिहावसं वाटत नाही. एकप्रकारची उदासी निर्माण होते, हे खरं!

**मी :-** तुमची लेखनामागची भूमिका काय आहे ?

**लेखिका :-** खरं पहायला गेलं तर, काही भुमिका घेऊन मी लिहीत नाही. जे जे क्लेषकारक आहे, मनाला जे वेदना देतं, दु:खं देतं, अस्वस्थ करतं, चीड आणतं... दुखतं, खुपतं, ओरबाडतं, कधी कधी रक्तबंबाळ करतं... तेंव्हा तेंव्हा माझ्या हातून लेखन होतं. आनंदाच्या क्षणी लेखन होईलच असं नाही, पण त्या क्षणांचा उपयोग लेखनात होऊ शकतो. समाजामधील अन्यायकारक गोष्टी, वाईट रूढी-परंपरा, एका माणसाकडून दुसऱ्या माणसाचं होणारं शोषण किंवा एखाद्या गटाकडून, समाजाकडून दुसऱ्या गटाचं, समाजाचं होणारं शोषण, होणार अन्याय पाहून मन सैरभैर होतं... मग अन्यायत्तेच त्यातून निर्माण होणारं लेखन समाज प्रबोधनाच्या दिशेनं जातं. एखादं पात्र बंडखोर बनतं... अन्यायाविरूद्ध बंड पुकारतं... शोषणमुक्त जगण्यासाठी धडपडतं. शोषणमुक्त समाज निर्माण व्हावा, लिंगभेद, वंशभेद, वर्णभेद, आर्थिक स्तरातून निर्माण झालेले वर्गभेद छेदून समाजाची मानवतेकडे वाटचाल व्हावी... ही माझ्या लेखनामागची भूमिका, उर्मी असावी.

**मी :-** शोध या वेश्या जीवनावर आधारीत कादंरीची प्रेरणा कशी मिळाली?

**लेखिका :-** मी हायस्कूलला कोल्हापूरला होते, तेव्हा सोमवार पेठेत... जिथं आता देशभूषण हायस्कुल आहे, तिथं पाठीमागच्या भागात चंपाबाई निरवे यांच्या घरात मामांच्या घरी रहात होते. माझं गाव रूकडी. अर्थातच रूकडीला जाणं येणं नेहमीचंच. दसरा चौकातून रेल्वेस्टेशनला नेहमीच चालत जायची-यायची. तेव्हा ओढ्याच्या पलिकडे वेश्या वस्ती होती. जाता येता त्या दिसायच्या. का कोण जाणे एका कुतुहलाने मी त्यांना निरखायची. माझ्याच वयाच्या मुली तिथं पाहून मी अस्वस्थं व्हायची. लग्नानंतर हे सगळं विस्मृतीत गेलं. पण आत

कुठंतरी ते ठाण मांडून बसलेलं होतं. आता जयसिंगपुरहून मिरजेला बसनी जाताना मिरजेच्या रस्त्यावर वेश्या वस्ती लागते. त्यांना पाहून आजही अस्वस्थ व्हायला होतं. मध्यंतरी एक दोन वेश्यांची मुलाखतही घेतली होती आणि एकदा दसरा चौक ओलांडून पुलावरून पुढं आल्यानंतर पट्दिशी विस्मृतीत गेलेली ती वस्ती आठवली. (जिथं आता मोठ मोठी शोरूम्स झालेली आहेत.) आणि मनात आलं कुठं गेल्या असतील या बायका? माझ्या वयाच्या मुलींचं काय झालं असेल? आणि मग शोधाचा प्रवास सुरू झाला. घरी परतेपर्यंत कादंबरीचा आराखडा मनात निर्माण झाला. वेश्यांच्या घेतलेल्या मुलाखती... त्यांच केलेलं निरीक्षण... अधेमधे वाचनात आलेल्या त्यांच्याविषयीच्या बातम्या... लिहिताना उपयोगात आल्या. एका झपाटलेल्या अस्वस्थतेत ही कादंबरी लिहिली गेली.

**मी :-** 'मृत्युदंड' कादंबरी लिहिण्यामागची भूमिका काय ?

**लेखिका :-** 'मृत्युदंड' ही समकालीन जैन समाज जीवनाची कादंबरी आहे. समाज जरी जाती-पातीतून विभागला गेला असला तरी मानवी विकार, मानसातील पुरूष प्रधानता सार्वत्रिक दिसते... तशी ती जैन समाजामध्ये असणंही स्वाभाविक आहे. तरी परंतु स्वत:ला धार्मिक म्हणवून घेणारी माणसंसुद्धा जेव्हा अर्धमनानं वागतात. दुसऱ्यांवर अन्याय करतात, तेव्हा मनात येतं, इथं धर्म कुठं राहिला? सर्वसामान्य स्वार्थी माणसाला तत्त्वज्ञानाशी घेणं देणं नव्हतं. त्याला फक्त स्वत:चं हितच दिसत असतं. समाजाच्या तुलनेत फक्त स्वत:चा समाज कुटुंबाच्या तुलनेत फक्त स्वत:चं कुटुंब आणि पती-पत्नीच्या तुलनेत फक्त मी... ही मीपणा जेव्हा हाताबाहेर जातो तेव्हा तो काय काय करतो... याबरोबरच जैन समाजामधील कालबाह्य रूढी-परंपरा-कर्मकांडाचा वाढता प्रभाव, धर्म आणि वास्तव, जीवनाची हात असलेली फारकत समाजाला दाखवण्याचा प्रयत्न या कादंबरीतून केलेला आहे. एखादी स्त्री (मग ती कुठल्याही जातीची असेना...) जेव्हा नवऱ्याच्या मनाविरूद्ध वागते... किंवा नवऱ्याची अरेरावी सहन करताना मुक्या जनावरासारखं वागते तेव्हा त्या नवऱ्याची ताकत कशी वाढत जाते... तिला छळण्याचे नवे नवे मार्ग कसे वापरात आणतो... हे जैन समाजाच्या माध्यमातून दाखवण्याचा प्रयत्न एकूणच जैन समाजामधील मूळ चाली-रीती,

रूढी-परंपरेतून समाज आपल्याला हवा तसा अर्थ काढून कसा वागतो आहे, जे जैन तत्त्वज्ञानात बसत नाही. अहिंसा आणि क्षमा या मूलभूत तत्त्वज्ञानाशी फारकत घेऊन तो कसा अन्याय करतो आहे... हे समाजासमोर आणण्याचा प्रयत्न मी या कादंबरीमधून केलेला आहे.

**मी :-** मॅडम, तुमच्या जडणघडणीवर कोणत्या विचारांचा प्रभाव आहे? का? सविस्तर सांगा?

**लेखिका :-** लग्नाआधीचं माझं जीवन अतिशय धार्मिक.... यात कर्मकांडापासूनच... रूढी-परंपरा आणि जाती-भेदातून आलेल्या उच्च नीचतेच्या भ्रामक कल्पनांतर्गत अनेक प्रकारच्या शिवाशिवी पाळण्यात गेलेलं आहे. अशाच संस्कारांचा (?) पगडा माझ्या आईवर आणि इतर नातलगांवर होता. माझी आई वगैरे स्त्रिया (यात पुरूषांचा समावेश नाही. त्यांना सर्व सूट) जैन सोडून इतर जातीमधील लोकांना शिऊनही घेत नव्हता. स्पर्श झालाच तर त्या कपडे बदलायच्या. बाजारातून आणलेल्या भाजीवरही माझी आई पाणी ओतून घ्यायची. हा त्या पिढीचा दोष नाही, तर त्यांना यापेक्षा दुसरं काही शिकवलंच नाही. अशा वातावरणात वाढलेली मी लग्नानंतर पूर्णत: बदलले. हा बदल माझ्या नवऱ्यानी घडवून आणला आणि याचा मला आनंद आहे.

लग्नाआधीसुद्धा या गोष्टी पहायच्या नाहीत पण आईसमोर बोलणं चालायचं नाही. आईच्या नकळत सगळं चालवायची पण समोर नाही. या सर्व गोष्टींचं वाईट वाटायचं. माझी आई माझ्या मैत्रिणींना शिऊन घ्यायची नाही. त्यांना आमच्या स्वयंपाकघरात प्रवेश नसायचा. याउलट माझ्या मैत्रिणींकडे मला त्यांचं सगळं घर मोकळं असायचं. त्यांच्या आया मला खूप माया करायच्या. तेंव्हा मनात कुठंतरी प्रश्न निर्माण व्हायचा, असं का? असं असता कामा नये. माझी आई त्यांच्या आईसारखी का वागत नाही? लग्नानंतर मला माझ्या मनासारखं वागता येऊ लागलं. माझ्या सासूबाई (आता हयात नाहीत) अशाच संस्काराच्या होत्या. पण माझे पती आणि दीर वगैरे वेगळ्या विचारांचे होते/आहेत. शिक्षणाने त्यांच्यात परिवर्तन घडवून आणलं होतं.

माझे पती रमेश... अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्यकर्ते आहेत. अंधश्रध्दा निर्मूलनाबरोबरच पुरोगामी विचारांची त्यांची पक्की बैठक आहे. त्याचाच परिणाम माझ्या आचार-विचारांवर झाला. आधी हे ते फारसं पटत नव्हतंच. आता माझ्याही विचारांना एक दिशा मिळाली. माझ्याबरोबरीच्या काही मैत्रिणी (जैन समाजातल्या) आणि जावा वगैरे आजही पारंपरिकच वागतात. आज मला वाटतं, अशा पुरोगामी विचारांचा नवरा माझ्या आयुष्यात आला नसता तर आज मीही... मंदिरातल्या आरत्या ओवाळत आणि एम. सी. चा विटाळ पाळत बसले असते.

**मी :-** मॅडम, तुम्ही आत्मकथन, लोकसाहित्य, बालसाहित्य इ. साहित्यप्रकार हाताळले आहेत. तुम्हाला प्रवासवर्णन लिहावेसे वाटते का?

**लेखिका :-** त्याचं असं आहे ... माझे कथा, कविता, कादंबरी, लोकसाहित्य, बालसाहित्य प्रकारात लेखन झाले पण अजून नाट्य आणि प्रवासवर्णन लिहायचे आहे. प्रवासात आलेल्या छोट्या छोट्या अनुभवावर मी अनेक लेख लिहिले आहेत. कस्तुरगंध नावाचे पुस्तक प्रसिध्दीच्या मार्गावर आहे.

**मी :-** सध्याच्या सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाविषयी...

**लेखिका :-** अनेक जाती-धर्मात विखुरलेला आणि राजकीय अराजकतेत पिसून निघणारा समाज आणि लोकशाहीचा होत असलेला खेळखंडोबा पाहून चीड येते. भारतीय संस्कृतिचे गोडवे कशासाठी गायचे? असा प्रश्न निर्माण होतो. स्वातंत्र्य मिळून एकसष्ट वर्षे झाली. शिक्षणाने समाज शिक्षित झाला तरी अजून सुशिक्षित झाला नाही. याची खंत वाटते. स्त्री-पुरूष असमानता अशिक्षितांमध्येच नव्हे तर सुशिक्षितांमध्येही अजून आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन अजून रूजलेला नाही. एका बाजूला विज्ञानाचे शोध लागत आहे. त्याचा फायदाही घेतला जात आहे तर दुसऱ्या बाजूला गंडे, दोर, बुवाबाजी करणाऱ्यांचे पेव फुटत आहेत. धर्माचे राजकारण आणि राजकारणाचे धर्मकारण करण्यात राजकारणी स्वत:चा स्वार्थ साधून घेत आहेत. सारासार विवेक कुठं राहिलाच नाही. विवेकवादी विचारांची चेष्टा होऊ लागली आहे. सत्याने, सचोटीने, विवेकाने वागणारे साधे, निर्व्यसनी लोक मूर्ख ठरू लागले आहेत.

चंगळवादी संस्कृतिचे जागतिकीकरण झपाट्याने होऊन लागले आहे. आणि त्यात संस्कृतिचे वस्त्रहरण अटळ होऊ पाहत आहे हे सर्व शक्य आहे का सत्तापिपासू राजकीय खेळीत मानवतेचे संदर्भच हरवणार आहेत? समाज एका असुरक्षिततेत भांबावलेला आहे. एक माणूस म्हणून या सर्वांना सामोरे जाताना मनात उदासीनता भरून राहिली आहे. समाजाचा एक भाग म्हणून असे होणे अपरिहार्य आहे.

**मी :-** आतापर्यंत प्रकाशित झालेल्यापैकी तुमची सर्वात आवडती कलाकृती कोणती? का?

**लेखिका :-** सोन्या ही माझी बालगुन्हेगार मुलाच्या जीवनावरची कादंबरी मला जास्त आवडते, याचे कारण गुन्हेगार कोणी जन्मत: नसतो. परिस्थिती त्याला गुन्हेगार बनवते. गुन्हेगार बननं हे ही काही येरागबाळ्याचं काम नाही. हुशारी, चिकाटी, बुध्दी, कष्ट, धाडस, हजरजबाबीपणा असे अनेक गुण... जे माणसाला चांगलंही बनवू शकतात आणि याच गुणांचा वापर वाईट गोष्टींसाठी केला तर त्याला गुन्हेगारही बनवू शकतात. एक आठ दहा वर्षांचा मुलगा गुन्हेगार कसा होतो? हे मी या कादंबरीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण जीवनावरची ही कादंबरी ग्रामजीवन... तिथल्या रूढी-परंपरा अधोरेखित करते. खेड्यातले वास्तव... तिथले कष्टप्रद जीवन आणि त्यातूनही शिल्लक असलेली माणुसकी, जी सोन्याला सच्चा माणूस बनवते. माणूस घडवणारी कादंबरी म्हणून ती मला आवडते.

**मी :-** नवोदित कवींना तुम्ही कसे मार्गदर्शन करता?

**लेखिका :-** नवोदित लेखक, कवींना मार्गदर्शन करण्याएवढी मी मोठी नाही पण बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर या सभेतर्फे आम्ही नव्याने लिहीणाऱ्यांसाठी लेखन कार्यशाळा आयोजित करत असतो. त्यांना वाचनाला प्रवृत्त करणे हा महत्त्वाचा भाग असतो. तसेच कथा, कविता लिहीण्यासाठी प्राथमिक अवस्थेतील सोपे मार्गदर्शन शाळा-शाळांतून करतो. जेंव्हा मोठ्यांसाठी मार्गदर्शन करायचे असते तेंव्हा... विषय कसे मिळतात? एखाद्या कथाबीजाचा विस्तार कसा होतो? वातावरणनिर्मिती कशी करायची? भाषा, संवाद, पात्ररचना त्यांची स्वभाववैशिष्ट्ये, नातेसंबंध कसे उलगडायचे? वगैरे मुद्यांना धरून मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न मी करते.

**मी :-** भविष्यकाळातील लेखन संकल्पाविषयी काय सांगाल?

**लेखिका :-** संकल्प करून, ठरवून मला लेखन करता येत नाही. एखादी घटना, एखादा प्रसंग मनाला काळजाला प्रसंग स्पर्शून जातो आणि एखादी कलाकृती, घटना, प्रसंगांच्या आवाक्यानुरूप तयार होते. कधी त्यांची कादंबरी होते. कधी कथा तर कधी कविता तयार होते. जेवढे बीज... जेवढा त्याचा जीव तेवढीच त्याची कलाकृती!

**मी :-** तुमचे स्त्रीवादी साहित्याविषयी काय मत आहे?

**लेखिका :-** स्त्रीवादी साहित्य म्हणजे स्त्रियांनी लिहीलेले किंवा स्त्रियांसाठी लिहिलेले साहित्य नव्हे. स्त्रीवादी साहित्य म्हणजे स्त्री एक माणूस म्हणून जगताना तिच्या नजरेतून काय आणि कसे दिसते? ते कसे स्त्रीला मारक आणि तिच्यावर अन्याय करणारे आहे? हे स्पष्ट करणारे साहित्य! पुरूषसत्ताक व्यवस्थेने स्त्रीला गौण, दुय्यम स्थान दिलेले आहे. पुरुषाच्या उपयोगितेसाठी स्त्रीचा जन्म आहे. ही जी पुरुषी धारणा आहे, तिला स्त्रीवाद छेद देतो. स्त्रीवाद हा पुरुष विरोधी वाद नाही किंवा स्त्रियांना श्रेष्ठ ठरवण्याचा अट्टाहास नाही तर, स्त्री हे एक स्वतंत्र माणूसच असून तिला माणसासारखे जगण्याचा हक्क आहे. हे सांगण्याचा मार्ग आहे. स्त्रीवादी साहित्याची वाटचाल माणूसपणाकडे जाते. म्हणून ती महत्त्वाची आहे.

**मी :-** तुमच्या पुस्तकांवर झालेल्या आतापर्यंतच्या समीक्षणाबद्दल तुम्ही समाधानी आहात का?

**लेखिका :-** माझ्या पुस्तकांवर फारशी समीक्षा झालीच नाही. मी त्यासंबंधी असमाधानी आहे. जाणकार समीक्षकांपर्यंत पुस्तक पोहचवूनही समीक्षा, एखादा अपवाद सोडता कुणी लिहीली नाही भलेही वाईट म्हणा... त्रुटी दाखवा पण लिहा... नवीन लिहीणाऱ्यांना जाणकारांच्या अभिप्रायाची अपेक्षा असते. मात्र वाचकांची पत्र येतात. असंख्य फोन येतात. ही पोहच महत्त्वाची असतेच पण प्रस्थापित समीक्षक नवोदितांकडे... त्यातूनही लहान गावात राहणाऱ्या साहित्यीकांकडे दुर्लक्ष करतात. ही गोष्ट खरी आहे.

मॅडम, तुम्ही मला वेळ काढून माझ्या सर्व प्रश्नांची चांगली उत्तरं दिलीत याबद्दल मी तुमची आभारी आहे.

## नीलम माणगावे यांच्या प्रकाशित पुस्तकांची सूची

### कथासंग्रह

१. साक्षीदार : मधुश्री प्रकाशन, प्र. आ. २००१.

२. तीच माती तेच आकाश : मधुश्री प्रकाशन, प्र. आ. २००२.

३. शांती तू जिंकलीस : सुमेरू प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२.

४. ज्वालामुखीच्या तोंडावर : निर्मोही प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००७.

५. फटफटलंय, आता नक्की उजडंल : निर्मोही प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००८.

### कादंबरी

१. डायरी : मनोदय प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९७.

२. जिद्द : मधुश्री प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९८.

३. सोन्या : मनोदय प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९९.

४. शोध : शालीन प्रकाशन, सांगली, प्र. आ. २००५

५. मृत्युदंड : शालीन प्रकाशन, सांगली, प्र. आ. २००६.

### काव्यलेखन

१. शतकाच्या उंबरठ्यावर : मनोदय प्रकाशन, प्र. आ. २००१.

२. जाग : सैनिक प्रकाशन, जयसिंगपूर, प्र. आ. २००१.

३. जीनज्योत : सैनिक प्रकाशन, जयसिंगपूर, प्र. आ. १९९९.

४. गुलदस्ता : पंचम प्रकाशन, प्र. आ. १९९५.

### आत्मकथन

१. जसं घडलं तसं : श्रीपाद प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९५.

### लोकसाहित्य

१. उखाण्यातून स्त्री दर्शन : मनोदय प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९७.

**बालसाहित्य**

१. परिराणी आणि छान छान गाणी : पंचम प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९५.

२. थुईथुई कारंजे भाग १ व २ : मनोदय प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९६.

३. बिट्टुकली : मनोदय प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९६.

४. तोच आमचा हिरो : मनोदय प्रकाशन, पुणे, प्र आ. १९९९.

५. चिंगळी : निर्मोही प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००५.

६. या चुकेला क्षमा नाही : निर्मोही प्रकाशन, पुणे. प्र आ. २००५.

७. हे हात जोडण्यासाठी : निर्मोही प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००५.

८. हसरी फुले : निर्मोही प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००७.

९. बकुळीची गोष्ट : निर्मोही प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००४.

१०. गौरी आणि चमेली : निर्मोही प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००७.

**विशेष समावेश**

१. महाराष्ट्र राज्य १२ वी पाठ्यपुस्तकात 'स्पर्श' कथेचा समावेश.

२. कर्नाटक राज्य १० वी मराठी पाठ्यपुस्तकात 'सत्कार' कथेचा समावेश.

३. 'शांते तू जिंकलीस' या कथेची चित्रपटासाठी निवड.

891.463
UBA
T15414